■ e-paper.diwanews.com ■ सोमवार, २९ एप्रिल २०२४ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. ■ RNI No.-MAHMAR/2021/80669 www.diwanews.com

दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

वर्ष–३

अंक–३९

संपादक : सुहास खंडागळे

## दिव्यात आरटीओचे अस्तित्वच नाही?



## शेअर रिक्षा चालकांकडून दिव्यात मनमानी भाडेवाढ

# प्रवाशांना दिलासा कधी?

| रिक्षा शेरींग दर पत्रक २०२४ | |
|---|---|
| दिवा स्टे.ते आगासन गेट/आगासन गाव/ एएनडी | 25/- (प्रती प्रवासी) |
| दिवा स्टे.ते गणेश नगर/ बेडेकर नगर/श्री हॉटेल | 20/- (प्रती प्रवासी) |
| दिवा स्टे.ते ग्लोबल शाळा /ओमकार नगर बी.आर.नगर/धर्मवीर नगर | 15/- (प्रती प्रवासी) |
| दिवा स्टे.ते बेतवडे गाव बेतवडे सर्विस सेंटर | 30/- (प्रती प्रवासी) |
| दिवा स्टे.ते रुनावल माय सिटी | 40/- (प्रती प्रवासी) |
| दिवा स्टे.ते मानपाडा | 45/- (प्रती प्रवासी) |
| आगासन गाव ते गणेश नगर/बेडेकर नगर | 15/- (प्रती प्रवासी) |
| दिवा स्टे.ते म्हातार्डी गाव | 25/- (प्रती प्रवासी) |
| दिवा स्टे.ते विठ्ठल रुक्मिणी मंदिर सेंट मेरी | 15/- (प्रती प्रवासी) |
| दिवा स्टे.ते मराठी शाळा (विठ्ठल मंदिर) | 10/- (प्रती प्रवासी) |
| दिवा स्टे.ते जीवदानी मंदिर (साबे) | 15/- (प्रती प्रवासी) |
| दिवा स्टे.ते दातिवली गाव/ फाटक | 20/- (प्रती प्रवासी) |

## शहरात रिक्षा मीटर नुसार सुरू करा दिवा मनसेची मागणी



### आरटीओ दरानुसार ठाण्यात पहिल्या दीड किलोमीटर साठी २३ रुपये, दिव्यात मात्र मनमानी भाडेवाडीमुळे शेअर रिक्षाला ३ सीटसाठी द्यावे लागतात ४५ रुपये!

**दिवा :–** दिवा शहरात शेअर रिक्षा चालकांनी भरमसाठ भाडेवाढ केल्याने सर्वसामान्य प्रवाशातून नाराजी व्यक्त होत आहे.शहरातील सर्व रिक्षा चालक हे शेअर रिक्षा स्टॅन्ड वरून रिक्षा वाहतूक करत असल्याने वाढीव भाडे वाढीचा फटका सामान्य प्रवाशांना बसत आहे. परिणामी आरटीओने दिवा शहरातून मीटरनुसार रिक्षा प्रवास ताकडीने सुरू करावा अशी मागणी आता नागरिक करत आहेत.

दिवा शहरातील शेअर रिक्षा चालकांकडून साधारण दीड किलोमीटरच्या प्रवासासाठी प्रत्येक सीट मागे पंधरा रुपये घेतले जात आहेत.आरटीओच्या नियमाप्रमाणे हा दर साधारण दहा रुपये पर सीट असायला हवा.मीटर रिक्षा नुसार पहिल्या दीड किलोमीटरसाठी २३ रुपये हा दर आरटीओने निश्चित केलेला आहे. मात्र दिवा शहरात आरटीओची कोणतीही यंत्रणा अस्तित्वात नसल्याने त्याचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे.दिवा शहर हे ठाणे महापालिका हद्दीत येत असले तरी येथे ठाणे आरटीओचे कोणतेही नियंत्रण नसल्याचे या प्रकारावरून स्पष्ट होत आहे. शेअर रिक्षा चालकांनी दिवा स्टेशन ते ग्लोबल स्कूल दरम्यानच्या साधारण दीड किलोमीटरच्या प्रवासासाठी पंधरा रुपये दर आकारला असून दिवा स्टेशन ते आगासन फाटक या साधारण सव्वा दोन किलोमीटरच्या प्रवासासाठी २५ रुपये प्रति सीट दर आकारला आहे. मीटरनुसार होणाऱ्या भाड्यापेक्षा तीन सीटचा दर हा जास्त आहे.

### शेअर रिक्षाचा प्रवास नागरिकांच्या घरापर्यंत नाहीच...

याशिवाय शेअर रिक्षा या दिवा स्टेशन ते आगासन,दिवा स्टेशन ते दातिवली,दिवा स्टेशन ते साबे रोड या भागात धावत असल्या तरी त्या प्रवाशांच्या घरापर्यंत प्रवाशांना सोडत नाहीत.प्रवाशांना मुख्य रस्त्यावर उतरून पुन्हा पायी त्यांच्या घरी जावे लागते. शेअर रिक्षामुळे नागरिकांना प्रायव्हेट रिक्षा करायची झाल्यास अवास्तव भाडे द्यावे लागते.परिणामी मीटर रिक्षा दिवा शहरात सुरू झाल्यास नागरिकांना त्यांच्या घरापर्यंत मीटरने भाडे देता येईल असं नागरिकांचे मत आहे. वाढीव रिक्षा दरामुळे दिवा शहरातील नागरिकांच्या भावना तीव्र आहेत.यामुळे अनेक नागरिकांनी आता पायी प्रवास करणे सुरू केले आहे. अर्धा रस्त्यापर्यंत पायी प्रवास करून पुढील प्रवास अनेक प्रवासी रिक्षाने करतात. याचा परिणाम रिक्षा चालकांच्या व्यवसायावरही होऊ शकतो. खरंतर आरटीओच्या नियमाप्रमाणे दिवा शहरात शेअर रिक्षा भाडे आकारायला हवे. डोंबिवलीमध्ये डोंबिवली स्टेशन ते रिजन्सी अनंतम गेट या साधारण तीन किलोमीटरच्या रस्त्यासाठी प्रति सीट २० रुपये आकारले जातात. त्याच ठिकाणी दिव्यात सव्वादोन किलोमीटर साठी २५ रुपये आकारले जातात.हा मनमानी कारभार थांबून दिवा शहरात आरटीओने जाहीर केलेले दर लागू करावेत व मीटर रिक्षा स्टॅन्ड दिवा शहरात सुरू करण्यात यावे अशी आग्रही मागणी आता होत आहे.

### मीटर रिक्षा नसल्याने एकाच कुटुंबातील प्रवाशांना प्रवासात बसतो फटका...

एखाद्या कुटुंबातील तीन नागरिकांना या भागात त्यांच्या घरी जायचं असेल तर शेअर रिक्षामुळे त्यांना ७५ रुपये मोजावे लागतात.तेच जर मीटर रिक्षा दिव्यामध्ये सुरू असली असती तर त्याच कुटुंबाला मीटर रिक्षा प्रमाणे ४५ ते ५० रुपये मोजावे लागले असते असं मत आता दिव्यातील नागरिक व्यक्त करत आहे.

## रिक्षा भाडेवाढीचा फटका प्रवाशांना, दिव्यात मीटर रिक्षा सुरू करा! दिवा मनसेचे अध्यक्ष तुषार पाटील यांची मागणी

शेअर रिक्षामुळे दिवा शहरातील सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक फटका बसत असल्याने शहरात असणाऱ्या रिक्षा स्टॅन्ड मधून प्रवाशांच्या सोयीसाठी मीटर रिक्षा सुरू कराव्यात व आरटीओने ठाणे शहरात लागू केलेले दर दिवा शहरात लागू करावेत अशी मागणी दिवा मनसेचे अध्यक्ष तुषार पाटील यांनी केले आहे.दिवा मनसेच्या वतीने याबाबत आरटीओ अधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले आहे.दिवा शहरातील सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी दिव्यातील मनमानी भाडेवारीला लगाम घालावा अशी मागणी आता तुषार पाटील यांनी मनसेच्या वतीने केले आहे. खरंतर दिवा शहरातील रिक्षा वाहतुकीचे दर हे आरटीओने ठरवायला हवेत मात्र येथे रिक्षा युनियन कोणत्या अधिकारात रिक्षा वाहतुकीचे प्रवासी दर ठरवते असा सवालही आता उपस्थित केला जात आहे.

दिवा शहरातील नागरिकात तीव्रभावना असून वाढीव रिक्षा भाड्या विरोधात नागरिक आता बोलू लागले आहेत.दिवा मनसेने या विषयाला वाचा फोडून रिक्षा भाडे कमी करण्यासाठी पाठपुरावा सुरू केला आहे. जो नियम ठाणे डोंबिवली या शहरातील रिक्षांना लागू आहे, त्याच पद्धतीचा नियम दिवा शहरातील रिक्षांना लागू करावा अशी मागणी दिवा मनसेचे सचिव प्रशांत गावडे यांनी केली आहे.

दिवा येथे झालेल्या शेअर रिक्षा भाडेवाढीची तक्रार आरटीओ विभागात प्राप्त झालेली आहे. त्या तक्रारीनुसार पथक नेमण्यात आले असून याबाबत लवकरच योग्य ती आरटीओ विभागामार्फत कारवाई केली जाईल अशी माहिती आरटीओच्या एका अधिकाऱ्याने बोलताना दिली.

### युनियनला भाडे दर ठरवण्याचे अधिकार आरटीओने दिले आहेत का? मनसेचा सवाल

रिक्षा भाडेवाढ किंवा शेअर रिक्षाचे भाडे दर ठरवण्याचे अधिकार हे आरटीओला आहेत.आरटीओने खाजगी रिक्षा युनियनना असे दर ठरवण्याचे अधिकार केव्हापासून दिले? असा प्रश्न आता नागरिकांच्या वतीने दिवा मनसेने विचारला आहे. मनमानी पध्दतीने वाढविलेल्या या दरपत्रकावर आरटीओ अधिकारी लक्ष देतील काय? दिवा शहरातील जनतेला ठाणे डोंबिवली शहराप्रमाणे मीटर रिक्षातून प्रवास करायला मिळेल का? असा प्रश्नही दिवा मनसेने विचारला आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. २९ एप्रिल २०२४
पान : २
www.diwanews.com

## ७ लाख ६० हजारांची खंडणी मागणाऱ्या तोतया फॉरेस्ट अधिकारी जेरबंद

**ठाणे:** माहिती अधिकाराचा दुरूपयोग करून फॉरेस्ट ऑफिस व इतर कार्यालयात केलेल्या तक्रारी मागे घेण्यासाठी वन टाईम सेटलमेंट करण्यासाठी फिर्याद व त्यांचे बांधकाम व्यावसायिक मित्र यांच्याकडे ०७ लाख ६० हजारांची खंडणी मागणाऱ्या तोतया फॉरेस्ट अधिकारी प्रसादकुमार उत्तम भालेराव (३३) याला ०५ लाख ६० हजार घेताना अटक केली. त्याने स्वीकारलेली रक्कम आणि तीन मोबाईल फोन असा ऐवज जप्त करण्यात आले आहेत. अशी माहिती ठाणे शहर पोलिसांनी दिली.

मुंब्रा- शीळ डायघर येथील फिर्यादी नफीस अहमद सिद्दीकी यांचा शिळ डायघर परिसरात बांधकाम व्यवसाय आहे. त्यांच्यासह इतर शिळ डायघर परिसरातील बांधकाम व्यावसायिकांना अटकेतील प्रसादकुमार याने तो फॉरेस्ट अधिकारी असल्याचे सांगुन चालू असलेल्या बांधकाम विरूद्ध फॉरेस्ट कार्यालय येथे तक्रार केली आहे. तसेच अटकेतील भालेराव हा माहितीचा अधिकाराचा दुरूपयोग करून फिर्यादी व इतर बांधकाम व्यवसायिक यांच्याकडुन वेळोवेळी पैसे वसुल केले आहेत. त्याने फॉरेस्ट ऑफिस व इतर कार्यालयात केलेल्या तक्रारी मागे घेण्यासाठी वन टाईम सेटलमेंट करिता २३ एप्रिल २०२४ रोजी ०७ लाख ६० हजारांची मागणी केली. यापैकी ०५ लाख ६० हजार रूपये स्विकारतांना त्याला ठाणे खंडणी विरोधी तसेच विशेष कृती दल या पथकांनी सापळा रचून २५ एप्रिल २०२४ रोजी शिळगाव खान कंपाऊंड येथील दोस्ती बिल्डींग या परिसरात रंगेहात पकडण्यात आले. त्याच्याविरोधात शिळ डायघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केल्यानंतर अटक केली. ही कारवाई विशेष कार्य दल, गुन्हे शाखेचे सहायक पोलीस आयुक्त शेखर बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकातील पोलीस निरीक्षक वनिता पाटील, यांच्या पथकाने केली .

## रुग्ण दगावल्याने नातेवाईकांनी केली कर्मचाऱ्याला मारहाण





### डॉक्टर-कर्मचाऱ्यांनी केले कामबंद आंदोलन

**ठाणे :** ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारार्थ दाखल केलेला रुग्ण दगावल्याने रुग्णाच्या नातेवाईकांनी दिव्यांग कर्मचाऱ्याला मारहाण केली. तसेच ब्रदरला रुग्णालयाच्या आवारात चाकूचा धाक दाखवला. त्याच्या निषेधार्थ शनिवारी रुग्णालयाच्या आवारात डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांनी आक्रोश व्यक्त करत कामबंद आंदोलन केले. यावेळी आंदोलनकर्त्यांनी मारहाण करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करून अटक करण्याची मागणी लावून धरली. पोलिसांनी बंदोबस्त वाढविण्याचे आश्वासन दिल्यानंतर पुन्हा डॉक्टर आणि कर्मचारी वर्ग काम रुजू झाले. मात्र या मारहाणीच्या घटनेनंतर रुग्णालयात भीतीचे वातावरण पसरले.

### बंदोबस्ताच्या आश्वासनानंतर घेत आंदोलन मागे

शनिवारी पहाटे पावणे चार वाजण्याच्या सुमारास २४ वर्षीय तरुणाला छाती दुखत असल्याने उपचारार्थ ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात आणण्यात आले. त्या रुग्णांला पाच वाजण्याच्या सुमारास त्याला वातानुकूलित वॉर्डमध्ये दाखल केले. त्यानंतर काही वेळाने तो रुग्ण दगावला. रुग्ण दगावल्याची माहिती मिळताच दारूच्या नशेत असलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांनी रुग्णालयातील दिव्यांग कर्मचारी राहुल गायकवाड यांना मारहाण केली. तसेच रुग्णालयातील ब्रदर किरण पारधे यांना चाकूचा धाक दाखविण्यात आला. हा प्रकार पहाटे सुमारास घडला. या घटनेच्या निषेधार्थ रुग्णालयातील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांनी रुग्णालयाच्या आवारात आक्रोश व्यक्त करत कामबंद आंदोलन पुकारले होते. तसेच यावेळी घोषणाबाजी करत मारहाण करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करून अटक करण्याची मागणी केली.

***दगावलेल्या रुग्णाच्या नातेवाईकांनी केलेल्या मारहाण आणि चाकूचा धाक दाखविल्यानंतर डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांनी सकाळपासून कामबंद आंदोलन पुकारले. तर रुग्णाचे नातेवाईक हे दारूच्या नशेत होते. पोलिसांनी या घटनेनंतर बंदोबस्त वाढविण्याबरोबर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांनी आंदोलन मागे घेत कामावर रुजू झाले.***

***– डॉ. कैलाश पवार, जिल्हा शल्य चिकित्सक,***
***ठाणे जिल्हा सामान्य शासकीय रुग्णालय***

## आयपीएल मॅचवर सट्टा लावणाऱ्या छत्तीसगडमधील तीन सट्टेबाजांना अटक

### १२ मोबाईल फोन, १ टॅब व १ लॅपटॉप जप्त

**ठाणे:** आरसीबी व सनरायजर्स हैद्राबाद यांच्यामधील टी २० आयपीएल मॅचवर सट्टा लावणाऱ्या छत्तीसगड मधील शानू ललित बेरीवाल (३०), रजत बाबूला शर्मा, (३०) आणि विजय सिताराम देवगन (४०) या त्रिकुटाला ठाणे शहर पोलिसांच्या खंडणी विरोधी पथकाने भिवंडी, कोनगाव येथील एका लॉजमधून अटक केली. त्यांच्याकडून १२ मोबाईल फोन, ०१ टॅब व ०१ लॅपटॉप असे एकूण ०१ लाख ९७ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तर त्यांच्या फरार साथीदाराचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

विशेष कृती दल तसेच खंडणी विरोधी पथकास मिळालेल्या माहितीच्या आधारे त्यांनी सापळा रचून गुरुवारी २५ एप्रिल २०२४ रोजी भिवंडी, कोनगाव येथील हॉटेल के.एन.पार्क, येथे छत्तीसगड येथील अटकेतील त्रिकुटाला आएपीएल मॅचवर सट्टा लावून जुगार खेळताना पकडण्यात आले. त्यांनी आपसात संगनमत करून लॅपटॉप मध्ये सुभलाभ नावाचे सॉफ्टवेअर मध्ये क्रिकेट मॅचवर सट्टा खेळणारे व्यक्तीकडून घेतलेल्या सट्टयाची माहिती भरून रियलमी पॅड टॅब मध्ये ताज ७७७ स्पोर्ट ॲप्लीकेशन वर आरसीबी व सनरायजर्स हैद्राबाद यांच्यामधील टी २० मॅच लाईव्ह बघून, सट्टा लावणाऱ्या इतर इसमाकडून ११ लाख ८६ हजार ८११ रुपयांचा सट्टा स्विकारला. तसेच रेड मी ९ कंपनीच्या मोबाईल मध्ये सुपर असिस्टंट ॲप्लीकेशन मध्ये फरार सट्टेबाज जानू यांची १९ नंबरची बुकीची बेटींग लाईन घेवून तिच्यावर ०७ लाख ०३ हजार रुपयांचा सट्टा लावला. तसेच सट्टा खेळण्याकरीता शासनाची दिशाभूल करण्याच्या उद्देशाने बनावट कागदपत्राचे आधारे सिमकार्ड घेवून शासनाची व मोबाईल कंपन्यांची फसवणूक केली आहे. याप्रकरणी कोनगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करत, त्या तिघांना अटक केली. तसेच त्यांच्याकडून १लाख ९७ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ते छत्तीसगड येथून आयपीएल मॅचवर सट्टा लावत असल्याचे समोर आले आहे. ही कारवाई विशेष कार्य दल, गुन्हे शाखेचे सहायक पोलीस आयुक्त शेखर बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकातील पोलीस निरीक्षक वनिता पाटील, यांच्या पथकाने केली.

## ठाणे कोपरी पूर्वेस तांबट पक्ष्याला जीवदान

### पालिका कर्मचारी आणि पक्षीमित्र भरत मोरे यांची भूतदया

**ठाणे :** गेल्या काही दिवसांपासून शहरातील तापमानाचा पारा वाढला आहे. याची कळत नकळतपणे झळ पशुपक्ष्यांना बसू लागली आहे. ठाणे कोपरी पूर्व येथील पोस्ट ऑफिस जवळ मुंबईचा पक्षी अशी ओळख असणारा तांबट या निपचित पडलेल्या पक्ष्याला



महापालिका कर्मचारी आणि पक्षीमित्र भरत मोरे यांनी शुक्रवारी जीवदान दिले आहे. पक्ष्यांची योग्य सुश्रुषा करून त्याच्या अधिवासात सोडले आहे.

ठाणे कोपरी पूर्व मीठ बंदर रोड पोस्ट ऑफिस जवळ, वाढत्या उष्म्याने हैराण झालेल्या तांबट पक्षी पडलेला आढळून आला. या पक्ष्यावर भूतदया दाखवत पोस्टमन अक्षय वाळके यांनी सामाजिक कार्यकर्ते आनंद कोळी यांच्याशी संपर्क साधला. आनंद यांनी ही माहिती महापालिका कर्मचारी आणि पक्षीमित्र भरत मोरे यांना सांगितले. त्यांनी तातडीने धाव घेऊन त्या तांबट पक्ष्याला पाणी पाजून तात्काळ सुश्रुषा केली. थोडा वेळात तांबट पक्ष्याला ताजतावन वाटल्यावर तांबट पक्ष्याला अधिवासात सोडुन दिले.

साधारण चिमणीच्या आकाराचा म्हणजे १९ सेमी लांबीचा हा पक्षा आहे तांब्याच्या हंडीवर हातोड्याच घाव घातल्यावर जसा आवाज येतो तशाच पद्धतीने हा ओरडतो, त्यामुळे स्थानिक भाषेत याला तांबट असे नाव पडलं असावं असं सांगितलं जातं.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

# दिवा शहराचे प्रश्न सोडवण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून भरघोस निधी मिळाला, शहराचे प्रश्न सोडवण्यासाठी यापुढेही कटिबद्ध राहू!




# डॉक्टर श्रीकांत शिंदे यांनी महायुतीच्या मेळाव्यात कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांशी साधला संवाद

**दिवा:- केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून मागील दहा वर्षात दिवा शहराला भरभरून निधी मिळाला असून मुख्यमंत्री व दोन्ही मुख्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली दिवा शहराचा विकास होत असे वक्तव्य खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांनी दिवा येथे आयोजित महायुतीच्या संवाद मिळाव्यात केले.**





या संवाद मेळाव्याला भाजपचे नेते रविंद्र चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.दिवा शहरातील महायुतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते. महायुतीतील शिवसेना-भाजप त्याचबरोबर मित्र पक्षांचे पदाधिकारी ही या मेळाव्याला उपस्थित राहिले होते.महायुतीचे उमेदवार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या प्रचारार्थ दिवा येथील ग्लोबल मैदानात शनिवारी रात्री संवाद या सभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलताना डॉक्टर श्रीकांत शिंदे म्हणाले की ही निवडणूक कोणा एका व्यक्तीची नसून देशाचे नेतृत्व ठरवण्यासाठी ही निवडणूक आहे.केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून दिवा शहराला भरभरून निधी दिल्याचे सांगत मागील दहा वर्षात दिवा शहराचा कायापालट झाल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले. पाचशे वर्षांची प्रतीक्षा संपवून राम मंदिर उभारण्याचं काम प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं.प्रत्येक घरात गॅस, शौचालय पोहोचवण्याचं काम केंद्र सरकारने केलं,देशाची अर्थव्यवस्था मजबूत करण्याचं काम करताना रेल्वेच्या सुविधा पुरविण्यास सरकारने पुढाकार घेतला, दिवा स्टेशनचा कायापालट करण्याचं काम केंद्र सरकारने केलं असल्याचं यावेळी श्रीकांत शिंदे म्हणाले.

कल्याण लोकसभेत मागील १० वर्षात मोठ्या प्रमाणात विकास कामे झाली असून



रिझर्वेशन काउंटर, पाचवी सहावी लाईन,दिव्यात फाटक बंद करून उड्डाणपूल उभारणे, अशी अनेक कामे होत असताना दिव्यातील रस्ते चांगल्या दर्जाचे करण्याचे काम आपल्या सरकारने केल्याचे श्रीकांत शिंदे यावेळी म्हणाले.दिवा रेल्वे स्थानकात कोकणात जाणारी प्रत्येक गाडी थांबण्यासह, दिवा सीएसटी फास्ट लोकल सुरू करण्यासाठी आगामी काळात प्रयत्न करणार असल्याचे शिंदे यावेळी म्हणाले.

वाय जंक्शन पूल, मुंब्रा उड्डाणपूल यामुळे प्रवास देखील वेगवान झाल्याचे श्रीकांत शिंदे यावेळी म्हणाले.यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, शिवसेनेचे नरेश म्हस्के, कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, कल्याण लोकसभा निरीक्षक रमाकांत मढवी,भाजपा जिल्हा अध्यक्ष संजय वाघुले, आरपीआयचे भास्कर वाघमारे, दिवा शहर मंडळ अध्यक्ष सचिन भोईर आदिलसह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. २९ एप्रिल २०२४
पान : ४
www.diwanews.com

# दिव्यात वारंवार भेडसावणारी पाणी समस्या हाच या निवडणुकीतील महत्त्वाचा मुद्दा – ज्योती पाटील

**दिवा:– मागील पाच वर्षात दिव्यातील माता भगिनींना पाणीटंचाई या समस्येमुळे प्रचंड त्रास झालेला आहे. अनेक कुटुंबांचा महिन्याचा पगार हा पाण्यासाठी खर्च झालेला आहे. एकंदरीत दिवा शहरातील पाणीटंचाई हा या निवडणुकीतील महत्त्वाचा मुद्दा असेल असे मत ठाकरेंच्या शिवसेनेच्या दिवा शहर महिला संघटिका ज्योती पाटील यांनी व्यक्त केले आहे.**






निवडणुकीच्या तोंडावर दिवा शहरातील नागरिकांना विविध आश्वासने देऊन मते पदरात पाडून घेण्यासाठी सत्ताधाऱ्यांची धावपळ सुरू आहे.मात्र मागील दहा वर्षांपासून दिवा शहरातील नागरिक मुबलक पाणीपुरवठा मागत असतानाही अद्याप दिवा शहराला मुबलक पाणीपुरवठा करू न शकणारे अन्य मुद्द्यांवर दिवावासियांचे लक्ष वळवू शकतात असेही ज्योती पाटील यांनी म्हटले आहे.दिवा शहराची खरी गरज ही मुबलक पाणीपुरवठा,आरोग्यव्यवस्था, स्वच्छता, शिक्षण याबाबत आहे.मात्र नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे संपूर्ण दुर्लक्ष मागील दहा वर्षात झाले असून येथील सर्वसामान्य जनता त्यांना भेडसावणाऱ्या पाणी प्रश्ना वरून यंदा मतदान करेल असा विश्वास ज्योती पाटील यांनी व्यक्त केला आहे. दिव्यात वारंवार भेडसवणारी पाणी समस्या हाच या निवडणुकीतील दिवा भागातील महत्त्वाचा मुद्दा असेल असेही ज्योती पाटील यांनीम्हटलेआहे.

## नालेसफाईची कामे विहित वेळेत पुर्ण करण्याचे आयुक्तांचे निर्देश

# कोलशेत येथील नालेसफाईची आयुक्त सौरभ राव यांनी केली पाहणी



**ठाणे :** कोलशेत, लोकमान्य सावरकर नगर परिसरातील नालेसफाईच्या कामास शनिवारी सुरूवात झाली असून नालेसफाईची कामे ही विहित मुदतीत पुर्ण करण्याचे निर्दे श ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी संबंधितांना दिले आहेत. तसेच नालेसफाई करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांची सुरक्षितता लक्षात ठेवून त्यांना आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व सोयी सुविधा पुरविण्याबाबतच्या सूचनाही कोलशेत येथील नाल्याची पाहणी दौऱ्यादरम्यान आयुक्तांनी दिल्या.

महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या निविदांना ठेकेदारांचा प्रतिसाद मिळाला असून आजपासून माजिवडा, लोकमान्यनगर येथील नाल्याच्या सफाईला सुरूवात झाली असून तसेच येत्या एक ते दोन दिवसांत सर्वच प्रभागातील नालेसफाईला सुरूवात होईल असे आयुक्त सौरभ राव यांनी यावेळी नम ूद केले. कोलशेत येथील नाल्याची पाहणी त्यांनी केली. नाल्यात उतरणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांची सुरक्षितता लक्षात घेवून त्यांना हॅण्डग्लोज, बूट, मास्क आदी सर्व साहित्य पुरविण्यात यावे. नालेसफाई करताना त्यातील संपूर्ण गाळ काढला जाईल, तसेच नाल्यात उगवणारी झाडेझुडपे काढण्यात यावीत अशा सूचनाही आयुक्तांनी संबंधित विभागाला दिल्या.

नालेसफाईचे काम हे विहीत वेळेतच पूर्ण होईल याकडे कटाक्ष असावा. नालेसफाईचे पर्यवेक्षण हे काटेकोरपणे करावे, जेणेकरुन पावसाळयात आपत्तीजनक परिस्थिती निर्माण होणार नाही या दृष्टीने संबंधित ठेकेदाराकडून काम करुन घेण्याचे आदेशही आयुक्त सौरभ राव यांनी संबधित विभागाला नाल्याच्या पाहणी दौऱ्यादरम्यान दिले.

कोलशेत येथील नाल्याची पाहणी आयुक्त सौरभ राव यांनी केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, तुषार पवार, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून चंद्र प्रकाश मीना व राहील गुप्ता हे २५–ठाणे लोकसभा मतदारसंघात दाखल

**ठाणे :** २५ ठाणे लोकसभा मतदारसंघासाठी चंद्र प्रकाश मीना (आयआरएस) व राहिल गुप्ता (आयआरएस) यांची निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारत निवडणूक आयोगाने या दोघांची खर्च निरीक्षक म्हणून नियुक्ती जाहीर केली आहे. चंद्र प्रकाश मीना व श्री. राहील गुप्ता हे भारतीय महसूल सेवेतील अधिकारी आहेत. चंद्र प्रकाश मीना हे भारतीय महसूल सेवेतील २०१० च्या बॅचचे अधिकारी आहेत. मीना हे २५–ठाणे लोकसभा मतदारसंघातील १४८–ठाणे, १५०– ऐरोली, १५१–बेलापूर या विधानसभा मतदारसंघासाठी कार्यरत असतील.

गुप्ता हे भारतीय महसूल सेवेतील २०१२ च्या बॅचचे अधिकारी असून ते २५–ठाणे लोकसभा मतदारसंघातील १४५ मिरा–भाईंदर, १४६ ओवळा–माजिवडा, १४८ कोपरी–माजिवडा या विधानसभा मतदारसंघासाठी कार्यरत असतील.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. २९ एप्रिल २०२४
पान : ५
www.diwanews.com

# कोलशेत विसर्जन घाट येथे राबविण्यात आलेल्या सर्वंकष

# स्वच्छता मोहिमेस नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**ठाणे : ठाणे महापालिका कार्यक्षेत्रातील माजिवडा मानपाडा प्रभागसमिती अंतर्गत आज (२७ एप्रिल) कोलशेत परिसरात आयुक्त सौरभ राव यांच्या उपस्थितीत सर्वंकष स्वच्छता अभियान राबविण्यात आले. कोलशेत महाविसर्जन घाट याठिकाणी दशक्रियाविधीसाठी नागरिक येत असून सदर परिसर हा नियमित स्वच्छ राहिल याचे नियोजन करावे. तसेच विसर्जन घाटाच्या दोन्ही बाजूस निर्माल्य कलश ठेवण्याच्या सूचना आयुक्तांनी यावेळी दिल्या.**





सदर स्वच्छता अभियानात सफाई कर्मचाऱ्यांसमवेत अतिरिक्त आयुक्त १ संदीप माळवी, उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, तुषार पवार, सहाय्यक आयुक्त प्रितम पाटील, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. यावेळी आयुक्तांनी कोलशेत खाडीकिनारी परिसरात साफसफाई केली. खाडी किनारी असलेल्या डेब्रीज आढळून आले असता, सदरचे डेब्रीज तातडीने उचलण्याबाबत कार्यवाही करण्यात आले. तसेच अनेक नागरिक हेनिर्माल्य कलशात न टाकता ते खाडीत फेकतात, त्यामुळे परिसराच्या सौंदर्यात बाधा येत असून परिसरही अस्वच्छ होत असल्याने नागरिकांनी निर्माल्य कलशातच टाकावे असे आवाहन आयुक्त सौरभ राव यांनी यावेळी केले.

यावेळी कोलशेत खाडीकिनारी विकसित करण्यात आलेल्या उद्यानाची पाहणी ही आयुक्तांनी केली. सदर उद्यान हे अत्यंत नियोजन पध्दतीने विविध प्रकारची झाडे लावून विकसित केल्याबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच याठिकाणी एका बाजूला लहान मुलांचे खेळण्याचे साहित्य व दुसऱ्या बाजूला नागरिकांसाठी खुली व्यायामशाळा केल्याबद्दल अधिकाऱ्यांचे कौतुक केले. यावेळी उद्यानात फेरफटका मारण्यासाठी आलेल्या नागरिकांशी संवाद साधून उद्यानात होत असलेल्या साफसफाईबाबत विचारणा केली, नागरिकांनीही नियमित साफसफाई होत असल्याचे आयुक्तांना सांगितले. तसेच नियमित चांगले काम करणाऱ्या माजिवडा हजेरी शेड येथील विमल दत्तात्रय केदारे या महिला सफाई कर्मचारी यांना आयुक्तांच्या हस्ते सन्मानपत्र देवून गौरविण्यात आले.

या परिसरात असलेल्या बायोगॅस प्रकल्पाचीही पाहणीही करुन या प्रकल्पाच्या आजूबाजूला झालेले अतिक्रमण तात्काळ हटवून संपूर्ण प्रकल्पाला बंदिस्त करण्याचे निर्देश आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले व पावसाळ्यात या ठिकाणी वृक्षारोपण करण्याच्या सूचनाही उद्यान विभागाला दिल्या.

यावेळी कोलशेत वरचा गाव ते कपालेश्वर ग्लोरियाबिल्डिंग, कोलशेत खालचा गाव ते लोढा ॲमेरा, ढोकाळी नाका, कापूरबावडी या परिसराची पाहणी आयुक्त सौरभ राव यांनी केली.

# ...तर मतदानाच्या शेवटच्या चार दिवसात रेल्वे स्थानकांवर आरपीएफची कुमक वाढवा

## केंद्रीय निवडणूक खर्च निरीक्षक

**ठाणे :** मुंबईची जीवनवाहिनी ही लोकल सेवा असून ठाणे, कल्याण, उल्हासनगर या परिसरात अनेक रेल्वे स्थानक आहेत. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने रेल्वेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर कॅशची ने-आण होण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे रेल्वे स्थानकांवर आरपीएफची नेमणूक करण्याचे निर्देश देताना, मतदानाचे शेवटचे चार दिवस हे अतिशय महत्वाचे असून या दिवसांत आरपीएफची कुमक वाढवा. असे ठाण्यात दाखल झालेल्या केंद्रीय निवडणूक खर्च निरीक्षकांनी बैठकीत नमूद केले.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांच्या अध्यक्षतेखाली समिती सभागृह, नियोजन भवन येथे निवडणूक खर्चाच्या अनुषंगाने आढावा बैठक आयोजित केली होती. या बैठकीस भिवंडी मतदारसंघाचे केंद्रीय निवडणूक खर्च निरीक्षक चित्तरंजन मांझी, कल्याण मतदारसंघाचे केंद्रीय निवडणूक खर्च निरीक्षक नकुल अग्रवाल, ठाणे लोकसभा मतदारसंघाचे केंद्रीय निवडणूक खर्च निरीक्षक चंद्र प्रकाश मीना व राहील गुप्ता आदी सर्व विभागांचे जिल्हा समन्वय अधिकारी उपस्थित होते. यावेळी सर्व विभागांच्या जिल्हा समन्वय अधिकाऱ्यांकडून सद्य:स्थितीत सुरू असलेल्या कामांचा आढावा चारही निरीक्षकांनी घेतला. लोकसभा निवडणूक २०२४ या करिता निवडणूक आयोगाने राष्ट्रीयकृत बँका, को-ऑपरेटिव्ह बँका व खाजगी बँकांकडून होणाऱ्या मोठ्या व्यवहारांसाठी देण्यात आलेल्या क्यू-आर कोडच्या माध्यमातून झालेल्या आर्थिक व्यवहाराबाबत कशा प्रकारे कारवाई करण्यात आली याबाबतची माहिती घेतली. तसेच सी-व्हिजिल ॲपच्या माध्यमातून आलेल्या तक्रारींची माहिती घेवून कशा पध्दतीने कारवाई केली जात आहे, याबाबतही निरीक्षकांनी जाणून घेतले. १३७ भिवंडी, १४६ ओवळा, १५० माजिवडा हे विधानसभा मतदारसंघ संवेदनशील असून या ठिकाणच्या नोडल अधिकाऱ्यांना या ठिकाणी जास्त लक्ष केंद्रीत करुन कायदा व सुव्यवस्थेबाबत योग्य ती खबरदारी घेण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या. दरम्यान, सर्व विभागांचे अधिकारी हे आपापले काम करीत असताना जर एखादी बाब आपल्या अखत्यारित नसेल पण जर त्या ठिकाणी काही आढळून आल्यास ते संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधून तातडीने कळविण्यात यावे. आपण सर्वजण करीत असलेले निवडणुकीचे काम हे टीम वर्क आहे. त्यामुळे व्हॉटसॲप ग्रुपच्या माध्यमातून एकमेकांशी संवाद साधत प्रत्येकाने काम करावयाचे आहे, असेही केंद्रीय खर्च निरीक्षकांनी यावेळी नमूद केले. यावेळी सूत्रसंचलन मुख्य वित्त व लेखा अधिकारी वैजनाथ बुरडकर यांनी केले. माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण नोडल अधिकारी मनोज सानप यांनी आभार मानले.

### *सर्व शासकीय यंत्रणांनी आपापसात उत्तम समन्वय राखावा...*

***देशात लोकसभा निवडणुकांचे बिगुल वाजले असून शेवटच्या पाचव्या टप्प्यातील निवडणुका येत्या २० मे २०२४ रोजी होत आहेत. ठाणे जिल्ह्यातील भिवंडी, कल्याण आणि ठाणे या लोकसभा मतदारसंघातील निवडणुका नि:पक्षपातीपणे, शांततेत व भारत निवडणूक आयोगाने आखून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार आदर्श आचारसंहितेचे पालन करुन यशस्वीपणे पार पाडण्यासाठी जिल्ह्यातील सर्व नोडल अधिकाऱ्यांनी गांभीर्याने काम करावे, सर्व शासकीय यंत्रणांनी आपापसात उत्तम समन्वय साधावा, असे निर्देश ठाण्यात दाखल झालेल्या केंद्रीय निवडणूक खर्च निरीक्षकांनी बैठकीत दिले.***

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. २९ एप्रिल २०२४
पान : ६
www.diwanews.com




# 'भयमुक्त कोकण, समृद्ध कोकण'चा नारा देत गाव विकास समितीकडून कोकणच्या जनतेचे मागणीपत्र जाहीर

## जनतेशी संघर्ष होणारे प्रकल्प नको, कोकणच्या हिताचे उद्योग हवे असल्याची भूमिका

**रत्नागिरी:–** लोकशाहीतील सामान्य माणसाचे हक्क अधिकार याचा सन्मान,भयमुक्त व दहशतमुक्त कोकण,कोकणचे कोकणपण राखून सर्वांगीण विकास,जनता आणि सरकार यांच्यात संघर्ष निर्माण करणारे प्रकल्प हद्दपार व्हावेत, तालुकानिहाय एमआयडीसी विकसित करून रोजगार निर्मिती असे मुद्दे मांडत गाव विकास समिती रत्नागिरी जिल्हा संघटनेने कोकणच्या जनतेचे मागणी पत्र जाहीर केले आहे.


जनतेचे मागणी पत्र जाहीर करताना गाव विकास समितीचे अध्यक्ष उदय गोताड यांनी म्हटले आहे की, कोकणच्या न्याय हक्कासाठी लढणारी कोकणातील तरुणांची संघटना गाव विकास समिती,रत्नागिरी जिल्हा मार्फत आम्ही कोकणातील सर्वसामान्य जनतेच्या भावनांचे मागणी पत्र या लोकसभेच्या निवडणुकीनिमित्त मांडत आहोत. कोकणावर प्रेम करणारा प्रत्येक माणूस या मागणीपत्राशी सहमत असेल असा आम्हाला विश्वास आहे.

**कोकणच्या जनतेच्या मागणी पत्रात गाव विकास समितीने खालील मुद्द्यांचा समावेश केला आहे:–**

भयमुक्त समाज घडवण्यासाठी लोकशाही समृद्ध होणे गरजेचे आहे. त्यामुळे लोकशाही आणि संविधान याच्या तत्त्वानुसार उमेदवाराने चालायला हवे अशाच उमेदवाराच्या पाठी कोकणची जनता उभी राहिल असा विश्वास या मागणी पत्रात व्यक्त करण्यात आला आहे.

कोणत्याही स्थितीत कोकणातील जनतेला संघर्ष करावा लागेल असे प्रदूषणकारी प्रकल्प कोकणात नको. प्रदूषणकारी प्रकल्प कोकणात येतात आणि त्याच्या विरोधामध्ये संघर्ष करण्यात अनेक वर्षे वाया जातात.शासन आणि जनता यामध्ये प्रकल्पावरून संघर्ष होतो.हा संघर्ष टाळून लोकांना हवे असणारे पर्यावरण पूरक उद्योगधंदे कोकणात यायला हवेत.कोकणच्या सौंदर्याला धक्का न लावता कोकणच्या आर्थिक विकासात हातभार लावतील असे उद्योगधंदे प्रत्येक तालुक्यात आणले जावेत.जेणेकरून कोकणातील प्रत्येक तालुक्यातील त्या त्या भागातील तरुणांना त्याच भागात रोजगार उपलब्ध होईल., फळप्रक्रिया उद्योग,ऑटोमोबाईल कंपन्या इ. असे या मागणी पत्रात म्हटले आहे.

ही निवडणूक देशाचं भवितव्य




ठरवणारी असल्याने व्यापक दृष्टिकोन लक्षात घेऊन सर्वसामान्यांचे हक्क अधिकार त्याचबरोबर लोकशाही मजबूत करण्याची भूमिका महत्त्वाची आहे. परिणामी गावातील समाज मंदिरे,एखादा रस्ता,पाखाड्या त्याचबरोबर गाव देणग्या अशा पद्धतीने कोणत्याही उमेदवारास मतदान होऊ नये. व्यापक जनहितासाठी मतदान व्हावे.गावातील प्रश्नांवर ग्रामपंचायत जिल्हा परिषद पंचायत समिती या निवडणुकात मतदान होत असते.यावेळी देशासाठी मतदान व्हावे,अशी अपेक्षा या मागणी पत्रात व्यक्त करण्यात आली आहे.

कोकणातील आरोग्य व्यवस्था मजबूत होण्याच्या दृष्टीने मागील अनेक वर्षात उपायोजना झाल्या नाहीत. आरोग्य व्यवस्था मजबूत होईल या दृष्टीने नागरिकांनी उमेदवाराकडे पाठपुरावा करावा.कोकणासाठी स्वतंत्र विद्यापीठाची मागणी गेली अनेक वर्ष आम्ही करतोय. कोकणच्या जनतेची ही मागणी लक्षात घेऊन कोकणासाठी स्वतंत्र विद्यापीठाचा आग्रह उमेदवाराकडे धरावा.

नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांवर आवाज उठवण्याचा अधिकार संविधानाने नागरिकांना दिला आहे. परिणामी नागरिकांवर दडपशाही करणारा उमेदवार या ठिकाणी नसावा.कोकणात पर्यटन विकासाबरोबरच तालुकानिहाय एमआयडीसी विकसित होणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक असल्याचे या मागणी पत्रात गाव विकास समितीने म्हटले आहे.

कोकण किनारपट्टीवर सर्व समाज एकोप्याने राहतात त्यामुळे धार्मिक द्वेष पसरवणाऱ्यांना कोकणात थारा नको,ही भूमिका कोकणवासीयांची आहे, असे महत्त्वाचे मुद्दे या मागणी पत्रात का विकास समितीच्या वतीने घेण्यात आले आहेत.



गाव विकास समितीचे अध्यक्ष उदयजी गोताड, संघटन प्रमुख सुहास खंडागळे आणि सर्व पदाधिकारी यांनी कोकण हिताचा विचार करून कोकणच्या जनतेचे मागणी पत्र मांडले आहे.कोकणातील जनतेने लोकशाहीच्या बाजूने उभे राहावे.कोकणातील वातावरण हे भयमुक्त आणि सामाजिक सलोख्याचे असावे.त्याचबरोबर कोकणच्या हिताचा निर्णय घेताना कोणत्याही भूलथापांना बळी पडू नये ही यामागची आमची भूमिका आहे.

**– डॉ. मंगेश कांगणे, सरचिटणीस,**
**गाव विकास समिती, रत्नागिरी जिल्हा**

# ठाण्यात १ ते १२ मे दरम्यान आंबा महोत्सव

**ठाणे:** यंदा असह्य उकाड्यातही ठाणेकरांना आंबा महोत्सवाची धूम अनुभवता येणार आहे. महाराष्ट्र राज्य कृषी विभाग आणि कृषी पणन मंडळ पुरस्कृत तसेच, संस्कार प्रतिष्ठान व कोकण विकास प्रतिष्ठानच्यावतीने १ मे ते १२ मे या कालावधीत सकाळी १० ते रात्रौ १० या कालावधीत ठाण्यातील गावदेवी मैदान येथे भव्य आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती संस्कार प्रतिष्ठानचे अध्यक्ष आमदार संजय केळकर यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिली. आंबा महोत्सवाचे हे यंदाचे १७ वे वर्ष आहे.

शेतकरी ते ग्राहक अशी थेट विक्री व्यवस्था असणाऱ्या या आंबा महोत्सवात, कोकणातील अस्सल हापूस, पायरी, रत्ना, केसर आंब्याबरोबरच, आंबा-फणस पोळी, सरबते, काजू, मालवणी मसाले, पापड अशा विविध दर्जेदार कोकणी उत्पादनांचे ४५ आणि बचतगटांचे पाच असे ५० स्टॉल्स लावण्यात येणार आहेत. यावेळी बोलताना आमदार संजय केळकर यांनी, दरवर्षी होणारा हा आंबा महोत्सव म्हणजे व्यापारी पेठ नसुन एक चळवळ आहे. गावदेवी मैदानात आंबा महोत्सवाला लाखो ग्राहक भेट देत असतात. तेव्हा, जास्तीत जास्त खरेदी आंबा महोत्सवात करून कोकणातील शेतकऱ्यांना पाठबळ द्यावे.असे आवाहन करून आ. केळकर यांनी याठिकाणी प्रत्यक्ष विक्री सोबतच ऑनलाईन विक्रीची सुविधाही उपलब्ध आहे. यावेळी मुख्य आयोजक आ. संजय केळकर यांच्यासमवेत कोकण विकास प्रतिष्ठानचे राजेंद्र तावडे, माजी उपमहापौर सुभाष काळे, ठामपा परिवहन सदस्य विकास पाटील आदी उपस्थित होते

सध्या हापुस आंब्याच्या नावाखाली सर्रास कर्नाटकचा आंबा विकला जातो. कोकणातील अस्सल हापुस कापल्यावर केशरी रंगाचा असतो. तर कर्नाटकी आंबा पिवळा असतो. तरी चोखंदळ ग्राहकांनी महोत्सवातच अस्सल हापुस खरेदी करावी. असे आवाहन कोकण विकास प्रतिष्ठानचे राजेंद्र तावडे यांनी केले आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. २९ एप्रिल २०२४ | पान : ७
www.diwanews.com

## ठाणे अन्नसुरक्षा अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल
## खासगी व्यक्तीस लाच स्वीकारताना रंगेहात अटक

**ठाणे:** सील बंद दुकान उघडून दिल्याबद्दल पाच हजारांच्या लाचेची मागणी करत ती स्वीकारणाऱ्या रोहन मोदी या खासगी व्यक्तीला ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) अटक केली आहे . तर त्याला सहमती दर्शवून प्रोत्साहन देणाऱ्या ठाणे अन्न सुरक्षा अधिकारी राजू धोंडीराम आकरूपे यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला असून त्यांचा शोध सुरु असल्याची माहिती ठाणे एसीबीने दिली.

**ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई**

तक्रारदारांनी ०१ एप्रिल रोजी ठाणे एसीबीत दाखल केलेल्या तक्रारीनुसार २२ एप्रिल २०२४ रोजी पडताळणी कारवाईत अन्न सुरक्षा अधिकारी राजू आकरूपे यांनी तक्रारदारांचे सील बंद दुकान उघडून दिल्याबाबत ०५ हजार रुपये अटकेतील मोदी याच्याकडे देण्यास सांगितले. तर मोदी याने पडताळणी दरम्यान फोनव्दारे आकरूपे यांनी सांगितल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच वसंत विहार नाका येथे सापळ्यात मोदीला लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले आहे. सदरची रक्कम आकरुपे यांच्याकरीता घेतली असल्याने त्याने सांगितल्यानंतर गुन्ह्यास सहमती दर्शवुन प्रोत्साहन दिल्याप्रकरणी चितळसर- मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास ठाणे एसीबीच्या पोलीस उपअधीक्षक अश्विनी पाटील करत आहेत.



## टँकरला लागलेल्या आगीने घोडबंदर रोडवर वाहतूक कोंडी

**ठाणे: २५ हजार लिटर खाद्यतेल घेऊन निघालेल्या टँकरच्या केबिनला लागल्याची घटना घोडबंदर रोडवरील चितळसर मानपाडा नाक्यावर घडली. ही आग जरी अर्ध्या तासात नियंत्रणात आणण्यात यश आले तरी मुंबईकडून घोडबंदर रोडकडे जाणारी मानपाडा ब्रीजवरील वाहतूक सुमारे ०१ तास बंद होती. या आगीत त्या टँकरची चालक केबिन पूर्णपणे जळून खाक झाली आहे. सुदैवाने यामध्ये कोणालाही दुखापत झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या अधिकाऱ्यांनी दिली.**

नवी मुंबई जेएनपीटी येथून सकाळीच २५ हजार लिटर खाद्यतेलाचा टँकर घेऊन चालक साजीद अली (२८) हा मनोर येथे निघाला होता. घोडबंदर रोडने जाताना सकाळ सव्वा सात वाजण्याच्या सुमारास टँकर चितळसर मानपाडा नाक्यावर येताच टँकरच्या केबिनला अचानक आग लागली. आगीने क्षणात रुद्र रूप धारण केले. याची माहिती मिळताच घटनास्थळी चितळसर मानपाडा पोलीस कर्मचारी, वाहतूक पोलीस कर्मचारी, अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेतली. तातडीने वाहतूक बंद करत अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले. यावेळी ०२-फायर वाहनांना पाचारण करण्यात आले होते. आगीने मानपाडा ब्रीजवरील वाहतूक सुमारे १ तास बंद करून त्या रस्त्यावरील वाहतूक सर्विस रोड वरून धीम्या गतीने सुरू होती. या आगीत टँकरची केबिन पूर्णपणे जळून नुकसान झाले आहे.तसेच अपघातग्रस्त टँकर वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांनी हायड्रा मशीनच्या सहाय्याने बाजूला करण्याचे काम केले. त्यानंतर वाहतूक सुरळीत झाली.



## अवैध अग्निशस्त्रांसह दोघांना अटक
### ८ पिस्टलसह गावठी कट्टे आणि २२ काडतुसे जप्त

**ठाणे:** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाणे शहर पोलिसांनी वेगवेगळ्या दोन गुन्ह्यात अवैध रित्या अग्निशस्त्र विक्रीसाठी आलेल्या दोघांना अटक केली. त्यांच्याकडून ६ पिस्टल आणि २ गावठी कट्टे, ०१ मॅगझीन आणि २२ काडतुसे जप्त केली आहेत. यामध्ये एक सराईत गुन्हेगार असून तो दाखल असलेल्या खुनाच्या गुन्ह्यात जामिनावर बाहेर आल्याची बाब तपासात पुढे आली आहे. तसेच हे अग्निशस्त्र उत्तरप्रदेश आणि बिहार मेड असून अटकेतील दोघे पैसे मिळविण्याच्या उद्देशाने विक्रीसाठी आले असावे अशी माहिती उपायुक्त शिवराज पाटील यांनी बोलताना दिली.

लोकसभा निवडणुक प्रक्रिया २०२४ कायदा व सुव्यवस्थेस बाधा न येता शांततेत पार प्रसावी या करिता पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या ठाणे गुन्हे शाखेच्या पथकांना जास्तीत जास्त अवैध शस्त्र, अमंली पदार्थ विरोधी कारवाई करावी असे आदेश दिले. याचदरम्यान ठाणे गुन्हे शाखा पथकाचे सहायक पोलिस आयुक्त शेखर बागडे यांच्यामार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक वनिता पाटील यांच्या पथकाने मूळ बिहारच्या शंभू सुरेश महतो (३५) याला अवैध अग्निशस्त्र विक्रीसाठी आला असताना अटक केली. त्याच्याकडून ०३ लाख ४० हजार रुपयांचे ४ पिस्टल, २ गावठी कट्टे , ०१ मॅगझीन आणि १८ जिवंत काडतुसे हस्तगत केले. ही कारवाईत १८ एप्रिल रोजी केली असून त्याला २५ एप्रिल रोजी पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. तसेच तो रेकॉर्ड वरील सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर नवी मुंबईतील रबाले पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल असून त्या गुन्ह्यात तो जामीनावर बाहेर आला आहे. तसेच वागळे इस्टेट गुन्हे शाखा ५ चे वरीष्ठ पोलीस निरीक्षक विकास घोडके यांच्या पथकाने अग्निशस्त्र विक्रीसाठी आलेल्या चंदीगड येथील शेराबहादूर नवबहादूर काटकी याला २३ एप्रिल २०२४ रोजी वागळे इस्टेट रोड नंबर २२ येथून अटक केली. त्याच्याकडून ०१ लाख ४ हजारांचे दोन गावठी पिस्टल आणि ४ काडतुसे हस्तगत केले असून त्याच्यावर पंजाबमध्ये अशाप्रकारे गुन्हा दाखल असल्याची माहिती पुढे आले आहेत.अशी माहिती पोलीस उपायुक्त पाटील यांनी दिली.

## लाचखोर पोलीस उपनिरीक्षकासह हवालदार ठाणे एसीबीच्या जाळ्यात

**ठाणे:** ॲल्युमिनीय पटट्या आणि टेम्पो असा पकडलेला ऐवज सोडविण्यासाठी दोन लाखांच्या लाचेची मागणी करत, १ लाख ९० हजार रुपये स्वीकारताना कळवा पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार माधव अर्जुन दराडे (४९) यांना पोलीस ठाण्याच्या बाहेरील रस्त्यावर रंगेहाथ पकडले. तर, दराडे यांना प्रोत्साहन देणारे कळवा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक तुषार तानाजी पोतेकर (४०) यांनाही ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी त्या दोघांविरोधात कळवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याची माहिती ठाणे एसीबीने दिली.

**पकडलेली गाडीसह आतील माल सोडविण्यासाठी मागितली दोन लाखांची लाच**

तक्रारदारांचा नाशिक येथील वाडीवरे येथे ॲल्युमिनीयम पट्टी बनवण्याचा कारखाना आहे. त्यांनी त्यांच्या कंपनीतील ॲल्युमिनीय पटट्या हा माल मुंबई येथे विक्रीसाठी आयशर टेम्पोमधून पाठवला होता. पण, १६ एप्रिल २०२४ रोजी तो टेम्पो मालासह कळवा पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी पकडला होता. त्यामुळे तक्रारदार हे तो सोडविण्यासाठी पोलीस ठाण्यात गेले असताना, पोलीस हवालदार दराडे यांनी त्यांना तो माल आणि टेम्पो सोडविण्यासाठी स्वतः करिता तसेच तपास अधिकारी पोलीस उपनिरिक्षक पोतेकर व वरिष्ठ पोलीस निरिक्षक उतेकर यांना देण्याकरीता एकूण ०२ लाख रुपयांची मागणी केली. ते पैसे दिले नाहीतर माल आणि गाडी पोलीस ठाण्याच्या आवारात सडत राहील अशी धमकी दिली. तसेच २४ एप्रिल २०२४ रोजीपर्यंत २ लाख रुपये घेवून येण्यास सांगितले. याचदरम्यान तक्रारदारांनी त्याच दिवशी ठाणे एसीबीत जाऊन तक्रार केली. त्या तक्रारीच्या अनुषंगाने २४ एप्रिल रोजी पडताळणी करताना पोलीस हवालदार दराडे यांनी तक्रारदारांच्याकडे लाचेची मागणी केल्याचे आणि पोलीस उपनिरीक्षक पोतेकर यांनी दराडे यांना प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले. तसेच हवालदार दराडे यांना तक्रारदारांकडून पोलीस ठाण्याच्या बाहेरील रस्त्यावर १ लाख ९० हजार रुपये स्वीकारताना रंगेहाथ पकडले. त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक पोतेकर यांना ताब्यात घेतले अशी माहिती ठाणे एसीबीने दिली. पुढील तपास एसीबीचे पोलीस निरीक्षक राजेश जागडे करत आहेत.

## मतदानाबाबत हाजुरी येथील दर्ग्यात जनजागृती

**ठाणे :** हाजुरी येथील दर्गात मुस्लीम बांधवांचा नमाज झाल्यानंतर स्वीप पथकाने नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. येत्या लोकसभा निवडणुकीत जास्तीत जास्त नागरिकांनी मतदान करावे असे आवाहन करण्यात आले. मतदानाचा टक्का वाढावा  व मतदान हे आपले राष्ट्रीय कर्तव्य असूनदिनांक २० मे रोजी सर्वांनी मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे असे आवाहन देखील यावेळी करण्यात आले. या उपक्रमास मुस्लीम बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसादमिळाला. ठाणे महानगरलिकेच्या उर्दु  शिक्षकांचे देखील या मोहिमेस सहकार्य मिळाले. स्वीप पथकातील राजेंद्र देसाई यांच्यासह अन्य सहकारी सहभागी झाले होते.

# कल्याण लोकसभेत ठाकरेंच्या शिवसेनेची मशाल विजयी व्हावी ही जनतेची लोकभावना – रोहिदास मुंडे



**लोकसभेचा आखाडा**

प्रतिनिधी

***दिवा:– कल्याण लोकसभेमध्ये मातोश्री आणि शिवसेना भवन येथून चालणारी बाळासाहेब ठाकरे यांच्या  शिवसेनेची मशाल विजयी व्हावी,ज्यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या कुटुंबाशी गद्दारी केली आहे त्यांचा पराभव व्हावा अशी या भागातील सर्वसामान्य जनतेची लोकभावना असल्याचे मत ठाकरेंच्या शिवसेनेचे दिवा शहर संघटक रोहिदास मुंडे यांनी व्यक्त केले आहे.***

कल्याण लोकसभेतील निवडणूक एकतर्फी असल्याचे काहीजण सांगत असले तरी वस्तुस्थिती तशी नाही.या निवडणुकीत निष्ठावंत शिवसैनिक बाळासाहेबांचा आदेश पाळतील त्याच बरोबर नव्याने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षासोबत आलेले कार्यकर्ते व संघटना यासुद्धा जोमाने काम करतील असा विश्वास रोहिदास मुंडे यांनी व्यक्त केला.कल्याण लोकसभा मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या पाठीशी निष्ठावंत शिवसैनिक, सर्वसाम ान्य जनता त्याचबरोबर या भागातील विविध समाज घटक मोठ्या ताकतीने उभे राहतील असे रोहिदास मुंडे यावेळी म्हणाले. मागील दहा वर्षाचा विद्यम ान खासदारांचा कारभार पाहिला तर त्यांच्या कार्यपद्धतीवर येतील भूमि पुत्र,स्थानिक नागरिक, त्याचबरोबर अनेक मान्यवर नाराज आहेत.त्यांच्या कार्यपद्धतीमुळे दुखावलेला भूमिपुत्र यावेळी खऱ्या शिवसेनेच्या पाठी ताकदीने उभा राहील व बाळासाहेबांची शिवसेना हीच खरी शिवसेना हे या निवडणुकीत मशाल चिन्हाला मतदान करून दाखवून देईल असा विश्वासही रोहिदास मुंडे यांनी व्यक्त केला.ज्या पद्धतीचं राजकारण मागील १० वर्षात कल्याण लोकसभा क्षेत्रात झालं ते चुकीचा पांयडा पाडणार असून विरोध करणाऱ्याला ज्या पद्धतीने शासकीय यंत्रणांकडून त्रास दिला जातो त्याचा राग येथील जनतेच्या मनात आहे.हा संताप मतदानातून व्यक्त होईल.त्याचबरोबर येथील जनता ही उद्धव साहेब ठाकरे यांच्याबरोबर झालेल्या गद्दारीमुळे संतापलेली असून दिघे साहेबांना आणि बाळासाहेबांना मानणारा मतदार यावेळी डुप्लिकेट शिवसेनेला त्यांची जागा दाखवून देईल असेही रोहिदास मुंडे यावेळी म्हणाले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवार वैशाली दरेकर यांना लोकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचेही रोहिदास मुंडेयावेळीम्हणाले.

SHWAAS
ACE NX HOSPITAL & RESEARCH CENTRE
Superspeciality Hospital
Our Passion Your Care
२५,००० ते २,००,००० पर्यंत विमा योजना

मुख्यमंत्री सहायता निधी
CM Relief Fund
फुफ्फुस प्रत्यारोपण
हिप रिप्लेसमेंट
अपघात शस्त्रक्रिया
कर्करोग (केमोथेरपी/रेडिएशन)
लहान बालकांचे शस्त्रक्रिया
अपघात
हृदयरोग
डायलिसिस
हाताचे प्रत्यारोपण
गुडघ्यांचे प्रत्यारोपण
विद्युत अपघात रुग्ण
नवजात शिशुंचे आजार
बर्न रुग्ण
मेंदूचे आजार
कर्करोग शस्त्रक्रिया
Address
Mahavir height, Golul Nagari, opp. Mumbai University, Wayle Nagar, Khadakpada, Kalyan, Maharashtra- 421301
Emergency
7777008464
9076229076